## गोवंशांना जीवनदान

**मुर्तिजापुर :** कत्तलीसाठी नेण्यात येत असलेल्या दोन गोवंशांचे प्राण शहर पोलिसांनी वाचविले. या प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. ९ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनला गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शहरातील एका ठिकाणी दोन गोवंशांना जिवनान दिले.

# महानगरपालिकेच्या रणांगणात राजकीय पक्षांची अंतर्गत फूट, गटबाजी आणि अस्तित्वाची लढाई

**अकोला,दि.१३ (प्रतिनिधी)**

महानगरपालिकेच्या उद्या होत असलेल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण प्रचंड अस्थिर, तणावपूर्ण आणि विस्कळीत झालेले दिसत आहे. प्रत्येक पक्ष सत्तेसाठी सज्ज असल्याचे जरी बाहेरून भासवत असला, तरी आतल्या गोटात मात्र विसंवाद, गटबाजी आणि अहंकाराच्या लढाया तीव्र झाल्या आहेत. या अंतर्गत संघर्षांचा थेट परिणाम निवडणूक रणांगणावर स्पष्टपणे जाणवू लागला आहे. स्थानिक पातळीवर पक्षाची अवस्था पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. स्थानिक नेते आपापल्या राजकीय गणितांनुसार आणि वैयक्तिक हितसंबंधांनुसार वेगवेगळ्या लोकांचे काम करत असल्याने पक्षातील एकसंघता पूर्णतः ढासळली आहे. कार्यकर्ते आणि नेतृत्व यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत असून, संघटनात्मक शिस्त फक्त कागदावर उरली आहे.एकाच पक्षाचे कार्यकर्ते वेगवेगळ्या दिशेने काम करत असल्याने खरी ताकद आतूनच खिळखळी होत आहे. सत्तेत असताना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस, लोकाभिमुख निर्णय घेण्यात पक्ष अपयशी ठरल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. घर टॅक्स वाढ केल्यामुळे जनतेत मोठ्या प्रमाणात संताप आहे. हद्दवाढ परिसरातील नागरिक निराश झाले आहेत. सत्ता असूनही जनतेच्या प्रश्नांवर प्रभावी तोडगा काढण्यात आलेला नसल्याने, वंचित आघाडी मर्यादित वर्चस्व आणि अंतर्गत कुरघोडी शहरातील काही मोजक्या प्रभागांमध्ये वर्चस्व असलेल्या वंचित आघाडी समोरही चित्र फारसे समाधानकारक नाही. ज्या प्रभागांमध्ये वंचित आघाडीला जनाधार मिळाला आहे, तेथेच अंतर्गत हेवेदावे, गटबाजी आणि नेतृत्वाची चढाओढ उफाळून येत आहे.आपापसातील कुरघोडी एकमेकांचे राजकीय अस्तित्व संपवण्यास कारणीभूत ठरू शकते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. मर्यादित प्रभावक्षेत्र असूनही अंतर्गत संघर्ष न आवरल्यास वंचित आघाडीला मोठी किंमत मोजावी लागू शकते.भाजप विरुद्ध शिवसेना (उबाठा) : थेट टक्कर या साऱ्या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट यांच्यात अनेक प्रभागांमध्ये थेट सामना रंगणार आहे.

हा संघर्ष केवळ जागांसाठी नसून तो विचारधारा, नेतृत्वाची विश्वासार्हता आणि जनाधार यांचा कस पाहणारा ठरणार आहे. दोन्ही पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची असून, पराभवाची किंमत मोठी ठरणार आहे.

# मकर संक्रांतीला खिचडी खाण्याची परंपरा आजही कायम; ग्रामीण भागात मकर संक्रांतीच्या दिवशी खिचडीचा प्रसाद

## यावर्षी मकर संक्रांतीच्या दिवशी एकादशी असल्याने खिचडी खाऊ नये

**अकोला,दि.१३ (प्रतिनिधी)**

कुटासा:अनेक ठिकाणी मकर संक्रांतीच्या दिवशी खिचडी खाण्याची परंपरा आहे. परंतु या दिवशी मकर संक्रांतीच्या दिवशी एकादशी असल्याने तांदूळ व खिचडीचे सेवन करू नये अशी आपली संस्कृती आहे यावर्षीचा योग कित्येक वर्षानंतर आला असून या दिवशी उपवास करावा तिळगुळाचे दान करावे सेवन करावे व उपवासाचे पदार्थ खावेत असे जाणकारांचे म्हणणे आहे.

सांस्कृतिक परंपरे सोबतच त्यामागे आरोग्यदायी फायदे देखील आहे. खिचडीचे सेवन केल्याने हिवाळ्यात शरीराला पोषण तर मिळतेच पण खिचडी खाल्ल्याने शरीरात ऊर्जा निर्माण होते.आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते.मकर संक्रांत हा भारतातील प्रमुख सणांपैकी एक सण आहे जो दरवर्षी १४ किंवा १५ जानेवारीला साजरा केला जातो. हा सण सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचे प्रतीक आहे. मकर संक्रांतीनंतर दिवस मोठा होतो आणि रात्र लहान होते. मकर संक्रांतीला कापणीचा सण देखील म्हटले जाते. मकर संक्रांत हा सण देशाच्या विविध भागात वेगवेगळ्या प्रकारे साजरा केल्या जातो. परंतु ग्रामीण भागात खिचडी खाण्याची आणि दान करण्याची विशेष परंपरा आहे.



खिचडीचा संबंध केवळ मकर संक्रांतीच्या सणाशी नाही तर त्यामागे अनेक सांस्कृतिक आणि आरोग्य विषयक कारणे देखील आहेत. हिवाळ्यामध्ये खिचडीचे सेवन केल्याने शरीराला उष्णता मिळते. त्यासोबतच ते एक संपूर्ण पौष्टिक अन्न देखील आहे. जाणून घेऊ खिचडी खाण्याचे काही फायदे आणि मकर संक्रांतीला खिचडी का खाल्ली जाते याचे कारण.मकर संक्रांतीला खिचडी खाण्याची परंपरा मकर संक्रांतीच्या दिवशी खिचडीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी डाळ, तांदूळ आणि तीळ यांची खिचडी केली जाते. मकर संक्रांतीच्या दिवशी खिचडी खाणे शुभ मानले जाते. उत्तर भारतातील अनेक भागांमध्ये विशेषतः उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये या दिवशी खिचडी बनवण्याची आणि खाण्याची परंपरा आहे. कारण हा सण सूर्यदेवाच्या उपासनेचा प्रतीक मानला जातो. तिळ,गुळ आणि दही टाकून खिचडी खाल्ली जाते. जी चवीला चांगली लागतेच पण त्यासोबत ती आरोग्यासाठी ही फायदेशीर मानली जाते. खिचडीचे आरोग्याला होणारे फायदे खिचडी हलकी आणि पचायला सोपी असते. त्यामुळे पचन संस्था निरोगी ठेवण्यास मदत होते. हिवाळ्यात जड आणि मसालेदार अन्न अनेकदा पोटासाठी त्रासदायक ठरते त्यामुळे खिचडी हा एक आरोग्यदायी पर्याय आहे. पोषक तत्त्वांनी समृद्ध : खिचडी मध्ये तांदूळ आणि डाळीचे मिश्रण प्रथिने, कार्बोहायड्रेट्स आणि फायबरचा चांगला स्त्रोत बनवते. त्यात तीळ आणि तूप टाकल्याने त्याची पौष्टिकता आणखीन वाढते.शरीराला उबदार ठेवते मकर संक्रांतीच्या काळामध्ये थंडी वाढलेली असते. त्यामुळे तीळ आणि उडीद डाळ यापासून बनवलेल्या खिचडीचे सेवन केल्याने शरीराला उष्णता मिळते आणि थंडीपासून बचाव होतो.रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: खिचडी मध्ये असलेली कडधान्य आणि तीळ शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. तसेच शरीराला इन्फेक्शनशी लढण्यास सक्षम बनवतात.ऊर्जा प्रदान करते: खिचडी मध्ये मोठ्या प्रमाणात कार्बोहायड्रेट असतात.

# एक ते आठ वर्गावर ३ शिक्षक दिनोडा शाळेतील प्रकार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा

## शिक्षण विभाग लक्ष देईल का; विद्यार्थी पालकाचा टाहो

**कुटासा,दि.१३ (प्रतिनिधी)**

अकोट पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्राम दिनोडा येथील जिल्हा परिषद शाळेत एक ते आठ वर्गावर ३ शिक्षक असुन २ शिक्षक आणि १ मुख्याध्यापक शिक्षिका असुन अश्या तिन शिक्षकांना एक ते आठ वर्ग सांभाळा लागत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे पालक वर्गामध्ये बोलल्या जात आहे.दिनोडा शाळेच्या मागील वर्षी १ मुख्याध्यापक आणि ३ शिक्षक व लाडकी बहिण शिक्षिका यांची नियुक्ती करण्यात आली होती मात्र या वर्षी शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या असून शासनाने मानधन बेसवर ठेवलेल्या शिक्षिकाचा कार्यकाळ संपला असून या सत्रात १ ते आठ वर्गावर भक्त तिन शिक्षक शाळा सांभाळत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळ खंडोबा होत आहे दिवसेंनदिवस ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे विद्यार्थ्यां शहरात



धाव घेत असल्यामुळे अनेक ठिकाणच्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत अश्या गंभीर बाबीकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे पालक वर्गामध्ये बोलल्या जात आहे तरी संमधीत शिक्षण विभागाने दिनोडा शाळेवर तात्काळ २ शिक्षकांची नेमणूक करुन विद्यार्थीचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी पालक वर्गांकडुन मागणी होत आहे.

## कलम ३७ (१) (३) लागू

**अकोला,दि.१३ (प्रतिनिधी)**

आगामी सण व निवडणूक कालावधी लक्षात घेता जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश २३ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहतील. या कालावधीत मोर्चे, आंदोलने काढण्यास, तसेच पाच किंवा पाचहून जास्त इसमांना एकत्रित येण्यास मनाई आहे. स्फोटके, दाहक पदार्थ वाहून नेण्यास किंवा शस्त्रे बाळगण्यास मनाई आहे. समाजात तेढ निर्माण करणारे कोणतेही कृत्य करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

# मनपाव्दारा वासुदेव वेशातील पोवाडा,गीत व लोककलेतून अकोल्यात व्यापक मतदार जनजागृती

**अकोला,दि.१३ (प्रतिनिधी)**

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. १३ जानेवारी २०२६ रोजी या उपक्रमांतर्गत सेवानिवृत्त मुख्याध्यापक सर्जे राव देशमुख यांनी वासुदेव वेश धारण करून पोवाडा, गीते व लोककलेच्या माध्यमातून मतदानाचा संदेश देत रस्तोरस्ती फिरून जनजागृती केली. त्यांच्या सादरीकरणातून मतदानाचा हक्क, लोकशाहीतील नागरिकांची जबाबदारी, निर्भय व निष्पक्ष मतदानाचे महत्त्व तसेच प्रत्येक मताचे मूल्य प्रभावीपणे मांडण्यात आले. लोककलेच्या या अनोख्या सादरीकरणामुळे नागरिकांनी मोठ्या उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.सदर जनजागृती मोहिमेत डिजिटल नोडल अधिकारी नईम फराज, मतदार जनजागृती सहायक संजय



खराटे तसेच मतदान केंद्र स्तरीय अधिकारी मो. मुस्लिम यांनी सक्रिय सहभाग घेतला. या पथकाने नायगाव, टारफैल व गवळीपुरा परिसरात प्रत्यक्ष भेटी देत मतदारांशी संवाद साधला.

यावेळी नोडल अधिकारी निवडणूक हरिशचंद्र इटकर यांच्या हस्ते मतदार नागरिकांना मतदान चिठ्ठयांचे वाटप करून मतदान प्रक्रिया, मतदान केंद्राची माहिती व आवश्यक सूचना समजावून सांगण्यात आल्या.या जनजागृती दरम्यान नागरिकांना आपले नाव मतदार यादीत नोंदले आहे का याची खात्री करण्याचे, तसेच वृद्ध, दिव्यांग व असहाय्य मतदारांना मतदान केंद्रावर नेण्यासाठी कुटुंबीयांनी व शेजाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. लोकशाहीच्या या महत्त्वाच्या प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाने निर्भयपणे व उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असा संदेश देण्यात आला.

# प्रभातच्या पालकांचा मतदान करण्याचा निर्धार




**अकोला,दि.१३ (प्रतिनिधी)**

मतदान करणे हे प्रत्येक नागरिकांचे प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी मतदान विषयक जाणीव जागृती करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद देत प्रभात किड्स स्कूलमध्ये मतदान जागृतीचा कार्यक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये पालकांना सेल्फी पॉईन्टद्वारे मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. सेल्फी पॉईन्टद्वारे पालकांनी मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला. आणि सर्व पालकांनी सामुहीक शपथ देखील घेतली. प्रभातच्या या उपक्रमामध्ये हजारो पालकांनी आपला सहभाग नोंदविला. आपल्या संपर्कात येर्णाया अन्य मतदारांना देखील मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करेल, अशी शपथ पालकांनी घेतली. या उपक्रमासाठी प्रभातच्या प्राचार्य वृषाली वाघमारे यांच्या मार्गदर्शनात नंदकिशोर डंबाळे, झिनल सेठ, समीर कुलकर्णी, पंकज देशमुख, मुक्ती र्कहेकर यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी

**अकोला :** बार्शिटाकळी तहसीलमध्ये रानडुकराच्या हल्ल्याची गंभीर घटना घडली आहे. या हल्ल्यात उजळेश्वर येथील रहिवासी शेतकरी भीमराव नारायण नानोटे हे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, भीमराव नानोटे यांचे शेत सर्वे क्रमांक १५७ मध्ये आहे. शेताची पाहणी करण्यासाठी जात असताना अचानक एका रान (जंगली) डुकराने त्यांच्यावर हल्ला केला. हा हल्ला अत्यंत तीव्र असल्याने त्यांच्या शरीरावर अनेक गंभीर जखमा झाल्या. परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत करत त्यांना उपचारासाठी अकोला येथील एका खासगी रुग्णालयात दाखल केले, जिथे त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी जंगली प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर तत्काळ नियंत्रण मिळवावे, तसेच जखमी शेतकऱ्याला योग्य ती मदत द्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. या प्रकरणी वनविभागाकडे तक्रार करण्यात आली आहे.

# पीक विमा योजना : पिंपरी खु. येथे तूर पीक कापणी प्रयोग

**अकोला,दि.१३ (प्रतिनिधी)**

अकोट तालुक्यातील उमरा महसूल मंडळातील पिंपरी खु. येथे प्रधानमंत्री पीक विमा योजनेत तूर पिकाचा पीक कापणी प्रयोग शुक्रवारी यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या पीक कापणी प्रयोगावेळी नाबार्ड विभागाचे जिल्हा विकास व्यवस्थापक श्री. श्रीराम वाघमारे सर, सौ. अस्मिता आवारे (तलाठी), भारतीय कृषी विमा कंपनीचे प्रतिनिधी श्री. अमोल ठोसरे व श्री. क्षितिज वाकोडे, तसेच संबंधित शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पीक कापणी प्रयोगाचे महत्त्व :**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पीक कापणी प्रयोग हा अत्यंत महत्त्वाचा व निर्णायक घटक आहे. हा प्रयोग प्रत्यक्ष शेतावर शास्त्रीय व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येतो. यामध्ये निवडलेल्या क्षेत्रातून पिकाचे प्रत्यक्ष उत्पादन मोजले जाते व प्रति हेक्टर सरासरी उत्पादन निश्चित



केले जाते.या प्रयोगातून प्राप्त झालेल्या आकडेवारीच्या आधारे संबंधित क्षेत्रातील उत्पादनातील घट, हवामानातील प्रतिकूल परिणाम व इतर नैसर्गिक कारणांमुळे झालेल्या पिक नुकसानीचा अचूक अंदाज घेण्यात येतो. याच आधारे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विमा नुकसान भरपाईची गणना केली जाते.सदर पीक कापणी प्रयोग शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सर्व संबंधित विभागांच्या उपस्थितीत व शेतकऱ्यांच्या साक्षीने पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यात आला. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना न्याय्य व वेळेत विमा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.



